आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र – संध्या ७.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यसभेत महिला आरक्षणाबाबत चर्चा सुरू

- शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर लवकरच एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरेंना नोटीस बजावणार

- न्यायालयात टिकणारं आरक्षण धनगर समाजाला देण्याची राज्य सरकारची भूमिका

- बदलीच्या आदेशांचं पालन न करणाऱ्या ४ उपजिल्हाधिकारी आणि ७ तहसिलदारांचं निलंबन

**आणि**

- राज्यात सर्वत्र गौरी-गणपतीचा उत्साह

**<><><><><><>**

राज्यसभेत आज ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ या  विधेयकावर चर्चा सुरू आहे. लोकसभेत काल हे विधेयक मंजूर झालं होतं. महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतीयांश आरक्षण देण्याची तरतूद या विधेयकात आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज याबाबतचं घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडलं. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या महिलांसाठीचं ३३ टक्के आरक्षण देखील सध्याच्या

कोट्या अंतर्गत दिलं जाणार असून, त्यासाठी जनगणना आणि सीमांकन आवश्यक असल्याचं मेघवाल यांनी सांगितलं.

<><><><><>

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना येत्या एक-दोन दिवसांत नोटीस पाठवणार आहेत. नार्वेकर यांनी कायदेतज्ज्ञ आणि विधीमंडळाच्या सचिवालयाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर दोन्ही गटाच्या प्रमुखांना नोटीसा पाठवण्याचा निर्णय घेतला असून, दोन्ही गटांच्या पक्षप्रमुखांनी आपली बाजू एक-दोन आठवड्यात मांडण्याबाबत या नोटीसा असण्याची शक्यता आहे, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

धनगर समाजाच्या आरक्षणाचा निर्णय घाईगडबडीत घेण्याऐवजी न्यायालयात टिकेल असं देण्याची सरकारची भूमिका असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाविषयी आज मुंबईत येथे बैठक पार पडली. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह इतर मंत्री, आमदार आणि धनगर समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. मध्य प्रदेश, बिहार आणि तेलंगणा राज्यात शासन निर्णय काढून काही समाजांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी धनगर समाजबांधवांच्या प्रतिनिधींसह शासकीय शिष्टमंडळ पाठवलं जाईल. या शिष्टमंडळाचा अहवाल ॲटर्नी जनरल यांच्याकडे पाठवून राज्य शासनाच्या पातळीवर त्याप्रमाणे निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन घेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. शासन निर्णय काढण्याच्या प्रक्रियेत काही अडचण आली तर आवश्यकतेनुसार

धनगर समाजाच्या आरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी माजी न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं. आंदोलनादरम्यान धनगर समाजबांधवांवर नोंदवण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

आरक्षण मिळण्यापूर्वी धनगर समाजाला आदिवासींच्या धर्तीवर योजनांचा लाभ देण्यात आला आहे. त्यासाठी 10 हजार कोटी रुपयांची तरतूद शासनाने केली असून धनगर समाजाच्या मागणीला पूरक भूमिका शासनाने उच्च न्यायालयात घेतल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

<><><><><>

यवतमाळमध्ये ओबीसी संघटनांनी घंटानाद आंदोलन केलं. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिल्यानं ओबीसींच्या आरक्षणाला धक्का बसेल असा आंदोलकांचा आरोप आहे. मराठा समाजाच्या स्वतंत्र आरक्षणाला विरोध नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात गेले तीन दिवस कांद्याचा लिलाव बंद असून, बाजार समित्यांमधली कोट्यवधी रुपयांची उलाढाल ठप्प झाली आहे. त्यामुळे  शेतकऱ्यांचं होत असलेलं नुकसान लक्षात घेता, जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी आज व्यापारी आणि बाजार समिती प्रतिनिधींची  बैठक घेतली. येत्या मंगळवारी, 26 सप्टेंबरला पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या दालनात कांदा व्यापाऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक होणार असून, तोपर्यंत त्यांनी आपलं  आंदोलन मागे घ्यावं असं आवाहन दादा भुसे यांनी केलं आहे. याबाबत बाजार समित्यांमधल्या  व्यापारी प्रतिनिधींशी चर्चा करून आपला निर्णय कळवू असं  कांदा व्यापाऱ्यांनी यावेळी सांगितलं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र – संध्या ७.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

**<><><><><>**

साखरेचे व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, त्यावर प्रक्रिया करणारे यांनी साप्ताहिक साखर साठा जाहीर करणं केंद्रानं बंधनकारक केलं आहे. साठेबाजार टाळण्यासाठी सरकार साखरेचा साठा आणि व्यवहारांवर बारीक नजर ठेवत आहे. हा पूर्णपणे डिजिटल उपक्रम असून याद्वारे साखर बाजार सुलभ होईल. याचं उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशारा सरकारनं एका निवेदनाद्वारे दिला आहे. साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमतीत विक्रमी वाढ होऊनही देशातले साखरेचे किरकोळ दर स्थिर आहेत. गरज भागवण्यासाठी साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, अशी माहितीही सरकारतर्फे देण्यात आली आहे.

**<><><><><>**

बदलीच्या आदेशांचं पालन न करणाऱ्या ११ अधिकाऱ्यांना राज्य सरकारच्या महसूल विभागानं निलंबित केलं. यात ४ उपजिल्हाधिकारी आणि ७ तहसीलदारांचा समावेश आहे. महसूल विभागानं एकूण ३० जणांची बदली केली होती. त्यातले हे ११ जण नव्या ठिकाणी रुजू न झाल्यानं ही कारवाई झाली. अधिकाऱ्यांनी तात्काळ कामावर रुजू व्हावे अन्यथा निलंबनाची कारवाई सुरू होईल, असा इशारा महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला होता.  यातले बरेचसे अधिकारी बदली रद्द करण्यासाठी मंत्रालय आणि मंत्र्यांच्या दालनामध्ये फेऱ्या मारत होते. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत मिळण्यात अडथळे येत होते.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र – संध्या ७.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

सोलापूरचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या जात प्रमाणपत्र प्रकरणी उच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशानुसार आता नवीन दक्षता पथक त्यांच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात पुन्हा सखोल पडताळणी करणार आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर पडताळणी समितीसमोर सुनावणीला सुरवात होईल, असं वरिष्ठ सूत्रांनी सांगितलं.

जयसिद्धेश्वर महास्वामी २०१९ मध्ये खासदार झाल्यानंतर त्यांचं जात प्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार सोलापूर जात पडताळणी समितीकडे आली होती. त्यानंतर समितीनं दक्षता पथकामार्फत चोकशी करुन महास्वामी यांचं जात प्रमाणपत्र बनावट ठरवलं. त्यावर महास्वामी यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

**<><><><><>**

राज्यात आज दुपारच्या सुमारास अनुराधा नक्षत्रावर महालक्ष्मीचं घरोघरी आगमन झालं. गौरींच्या स्वागतानंतर आता उद्याच्या गौरी पूजनाची तयारी घरोघरी सुरू झाली आहे. गौरी पूजनासाठी निरनिराळी फळं, भाज्या, तसंच हार फुलं घेण्यासाठी बाजारपेठांमधून नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. उद्या पूजनानंतर परवा गौरींचं विसर्जन होणार आहे.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यातल्या विद्यार्थ्यांनी झाडांच्या बिया टाकून गणेश मूर्ती तयार केल्या आहेत. कवडा इथल्या मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालयातले कलाशिक्षक दिलीप दारव्हेकर यांनी विद्यार्थ्यांना याचं प्रशिक्षण दिलं. याविषयी आमच्या वार्ताहरानं अधिक माहिती दिली.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७.००वाजता

२१ सप्टेंबर २०२३ – गुरुवार

**होल्ड - हिंगोली व्हाइस कास्ट**

**<><><><><><>**

यवतमाळमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तींना भाविकांना अधिक पसंती दिली. परिणामी मातीच्या मुर्ती शिल्लक राहिल्यानं मुर्तीकारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केलं. बंदी असलेल्या पीओपीच्या मुर्तींवर प्रशासनानं कारवाई न केल्यानं त्यांनी शिल्लक मूर्ती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठेवल्या.

**<><><><><><>**

पालघर जिल्ह्यात वाडा तालुक्यामध्ये दीड दिवसांच्या गणपतींच्या विसर्जना दरम्यान दोन वेगवेगळया ठिकाणी तीन जणांचा तलावात बुडून मृत्यु झाला. कोणसई गावात काल रात्री गणेशविसर्जनाच्या वेळी दोन, तर गोऱ्हे इथं एकाचा तलावात बुडून मृत्यू झाला.

**<><><><><><>**

आलिशान आणि आरामदायी डेक्कन ओड़ीसी ही रेल्वे राज्य सरकारनं पुन्हा सुरू केली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर आज बदल केलेल्या या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. यातल्या २१ डब्यांमध्ये ४० डिलक्स सूट आणि दोन प्रेसेडेन्सियल सूट आहेत. याशिवाय सभागृह, हेल्थ स्पा, जिम, केबल टीव्ही, इंटरनेट, ग्रंथालय, अशा सोयीसुविधा आहेत. महाराष्ट्रासह इतर राज्यातल्या पर्यटन स्थळांनाही ही गाडी आता भेट देणार आहे.

**<><><><><><>**

वर्धा इथं इंद्रप्रस्थ कॉलेजात काल मेरी माटी, मेरा देश कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आला होता. शहीदांच्या कार्याची आठवण सतत होत रहावी तसंच

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोपानिमित्त हे अभियान सुरू असल्याची माहिती आमदार डॉ. पंकज भोयर दिली.

<><><><><>

**चंद्रपूर** जिल्ह्यात गेल्या काही दिवसात दडी मारलेल्या पावसाचं चंद्रपूर शहरासह जिल्ह्याच्या बहुतांश भागात पुनरागमन झालं आहे..

वाशिम जिल्ह्यांत वाशिम, कारंजा, मालेगांव, रिसोड आणि मंगरूळपीर तालुक्यात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस झाला आहे.

**बीड** शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज जोरदार पाऊस पडला.

सोलापूर जिल्ह्यात सांगोल्यासह इतर तालुक्यात आज सायंकाळी सर्वत्र दमदार पाऊस झाला.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात मंगळवारपासून पावसाचा जोर वाढला आहे. हा पाऊस भातशेतीसाठी दिलासादायक असल्यान शेतकरी सुखावला आहे; तर दुसरीकडे पावसामुळे गणेशभक्तांच्या आनंदावर मात्र विरजण पडलं आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//